**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक: 12/12/2017.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>डिसेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक 20 डिसेंबर 2017 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल:-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

**3. नवी मुंबई स्वच्छता मिशन तदर्थ समिती कडील प्रस्ताव :-**

नवी मुंबई महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन) उपविधी, 2017 च्या मंजूरीबाबत तसेच नागरिकांमध्ये जनजागृती व उपविधीची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी क्लिनअप मार्शल योजना राबविणे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**4.** महिला व बालकल्याण समिती मार्फत सन्मा. महिला नगरसेविकांचा अभ्यास दौरा आयोजित करणे.

**5.** नमुंमपा कार्यक्षेत्रामध्ये तीन वर्षाच्या कालावधीसाठी श्वान नियंत्रणाचा कार्यक्रम राबविणेकरीता प्रशासकीय मान्यता मिळणे.

**6.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयामध्ये जन औषधी सुविधा उपलब्ध करणे.

**7.** खाजगी वैद्यकिय महाविदयालये / खाजगी वैद्यकिय संस्था यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णखाटा शैक्षणिक प्रयोजनार्थ देण्यासाठी शुल्क आकारणीबाबत.

**8.** खाजगी वैद्यकिय महाविद्यालये / खाजगी वैद्यकिय संस्था यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णखाटा शैक्षणिक प्रयोजनार्थ देण्यासाठी शुल्क आकारणीबाबत.

**9.** बेलापूर से. 8बी कल्पतरु सोसायटी मागील गटाराची सुधारणा करणे व संरक्षक भिंत बांधणे.

**10.** बेलापूर-शहाबाज से-19 येथे जुने कर्मचारी निवासस्थान तोडून नवीन कर्मचारी निवासस्थान बांधणे.

**11.** बेलापूर विभागातील से.3 ए भु.क्र.1सी येथे नागरी आरोग्य केंद्राची इमारत बांधणे.

**12.** न.पा. शाळा क्र.म.मुं. 55 राजर्षी शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर येथे 50KW क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारणे.

**13.** सी.बी.डी. बेलापूर से.8बी रमाबाई आंबेडकर नगर येथील रस्त्याची दुरुस्ती करणे.

**14.** कोपरखैरणे विभागातील श्रमिकनगर येथील भूखंड क्र. OS-2/2(ए) व 2/3(ए) येथे शाळेची नवीन इमारत बांधणे.

**15.** राजमाता जिजाऊ रूग्णालय ऐरोली येथे सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे.

**16.** सन 2017-18 सालाकरीता औषधे खरेदी करणेकरीता प्रशासकीय मान्यता मिळणे.

**17.** बेलापूर विभागातील नेरूळ से.44ए येथील गटार व पदपथाची दुरूस्ती करणे.

**18.** विभाग स्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरण (कोकण) कार्यालयासाठी बेलापूर भवन येथील सातवा मजल्यावरील 250. चौ.मी. जागा भाडेतत्वावर उपलब्ध करून देणे.

**19.** नामकरण प्रस्तावाबाबत

**20.** तुर्भे विभागातील सानपाडा सेक्टर 4 भु.क्र.17 येथे दैनंदिन बाजार विकसित करणे.

**21.** ऐरोली से.03 भारत बिजली अंडरपास येथील रस्त्याचे रुंदीकरण करणे कल्वर्ह बांधणे व तत्सम कामे करणे.

**22.** वाशी सेक्टर 1अे भू.क्र.3 येथे दैनंदिन बाजार विकसित करणे.

**23.** कोपरखैरणे विभागातील सेक्टर 22 येथील MCH ते कैलास राघू सोसायटी व अजंटा सोसायटी ते मधुबन सोसायटीपर्यंत गटर व फुटपाथची सुधारणा करणे.

**24.** कोपरखैरणे प्र.क्र.30 सेक्टर 6 येथील स्टॉर्म वॉटर ड्रेनची सुधारणा करणे.

**25.** कोपरखैरणे विभागातील सेक्टर 19 येथील प्लॉट नं. 54, प्लॉट नं. 175 रणादेवीमाता मंदिराजवळ, मुक्तीधाम स्मशानभुमी जवळ व से.20, प्लॉट नं. 24-26, प्लॉट क्र. 26-28 व प्लॉट क्र. 36-37 जवळील स्टॉर्म वॉटर ड्रेनची सुधारणा करणे.

**26.** वाशी से.28 व 29 येथील ब्ल्यु डायमंड हॉटेल ते कोपरी सिग्नल पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.

**27.** वाशी सेक्टर 1ए प्रभाग क्र. 64, येथील पोलिस स्टेशन ते एन.एम.एस.ए. पर्यंतच्या गटर व पदपथ बांधणे.

**28.** ठाणे बेलापूर रस्त्यालगत दिघा येथे FOB (पादचारी पूल) बांधणे.

**29.** वाशी सेक्टर 14 येथील साईदीप सोसायटी ते साई पॅलेस सोसायटी येथील पावसाळी गटाराची सुधारणा करणे.

**30.** बेलापूर विभागातील नेरूळ से. 21, 23, 25, 27, आम्र मार्ग, बेलापूर से. 19, 20, 21/22 मध्ये नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या(फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.)

**31.** बेलापूर विभागातील सी.बी.डी. से. 1 ते 10 मध्ये नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या(फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.)

**32.** बेलापूर विभागातील नेरूळ से. 28, 36, 40, 42, 42ए, 46, 46ए, 48, 48ए, 50(प), एन.आर.आय. कॉप्लेक्स 58, 58अे येथील नागरिकांना चालण्यासाठी अर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या (फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.)

**33.** कोपरखैरणे विभागात नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे, इलेक्ट्रीक पोल, फीडर पिलर, एम.टी.एन.एल. बॉक्स शिफ्ट करणे)

**34.** ठाणे-बेलापुर रस्त्यावर नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या (फुटपाथ बांधणे, पावसाळी ड्रेन बांधणे, रंगकाम करणे.)

**35.** ऐरोली विभागात नागरीकांना चालण्यासाठी बॅरिअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, चौकात ग्रील बसविणे व एफ आर पी कव्हर्स बसविणे)

**36.** दिघा विभागात नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करण्याच्या (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, ग्रील बसविणे व रंगकाम करणे, इलेक्ट्रीक पोल, फीडर पिलर शिफ्ट करणे)

**37.** कोपरखैरणे विभागातील कोपरखैरणे गांव येथील साईश्रदधा अपार्टमेंट, साईराम अपार्टमेंट, ओमकार अपार्टमेंट, सची अपार्टमेंट व अमोल अपार्टमेंट जवळील पावसाळी गटाराची सुधारणा करणे.

**38.** तुर्भे विभागातील सानपाडा येथील ब्रीज से. 8 ते नाना धर्माधिकारी चौक से. 11 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणे.

**39.** वाशी सेक्टर 16अ येथील विष्णुदास भावे नाटयगृहाचे नुतनीकरण व सुधारणा करणे.

**40.** तुर्भे विभागातील सानपाडा येथील संभाजी चौक से. 08 ते वेस्टर्न कॉलेज से. 09 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणे.

**41.** वाशी सेक्टर 10ए भूखंड क्र. 11 टेनिस कोर्ट लगतच्या मैदानामध्ये आंतरक्रिडा इमारत (Indoor Sport Building) बांधणे.

**42.** बेलापूर विभागातील सी.बी.डी. से. 3 येथील बी-10/8 ते सी-6/8 निलकमल सोसायटी पर्यंतच्या गटाराची व पदपथाची सुधारणा करणे.

**43.** ऐरोली से. 3 येथील अग्निशमन केंद्राची जुनी सिडकोकालीन इमारत तोडून नवीन इमारत बांधणे.

**44.** कोपरखैरणे सेक्टर 15 येथील स्कायलार्क सोसायटी ते वसुंधरा डेअरी पर्यंत व रो हाऊस नं. 69 लगत हेवी डयुटी गटर बांधणे.

**45.** तुर्भे टी.टी.सी. औदयोगिक क्षेत्रातील डी ब्लॉक मधील भु.क्र. डी-268 ते फायझर रोड व भु.क्र. डी-342 ते भु.क्र. डी-257 पर्यंत रस्ता व ड्रेनची सुधारणा करणे.

**46.** घणसोली सेक्टर 7 येथील भुखंड क्रमांक 11 येथे शाळेची नवीन इमारतीचे बांधकाम करणे.

**47.** नवी मुंबई महानगरपालिकेस अतिक्रमण विभागासाठी पिकअप व्हॅन वाहन भाडयाने पुरविणे.

**48.** नमुंमपा शिक्षण विभाग अंतर्गत बालवाडीच्या विदयार्थीना सकस आहार पुरवठा करणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळणे.

**49.** तुर्भे सेक्टर-19ए व 19एफ मध्ये विविध ठिकाणी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणे.

**<u>ठरावाच्या सूचना</u> :**

**50 व 51. श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-**

**(50)** घणसोली भुखंड क्र. 6 से.7, येथील भूखंड रुग्णालयाचा असुन सदर भुखंड सिडको कडुन महानगरपालिकेस हस्तांतर झाला आहे. सदय परिस्थितीत घणसोली नोड मध्ये महानगरपालिकेचे एकही रुग्णालय नसल्यामुळे येतील अति अल्प उत्पन्न गटातील लोकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे, आणि उपचारासाठी वाशी, ऐरोली अशा ठिकाणी महानगरपालिकेच्या रुग्णालयात जावे लागत आहे. गेली 15 वर्ष महापालिकेस कर भरणाकरुन सुध्दा कुठल्याही आरोग्य विषयक सुविधा नागरिकांना प्राप्त झाल्या नाहीत. त्याकरिता सदर ठिकाणी रुग्णालय बांधणे. **(51)** घणसोली भुखंड क्र. 10, से. 7 येथील भुखंड हा समाज मंदिराचा असुन सदर भूखंड हा सिडकोकडून महानगरपालिकेस हस्तांतर झालेला आहे. सदय स्थितीत घणसोली नोड मध्ये एकही समाज मंदिर नाही, सदर भुखंडावर समाज मंदिर बांधण्यात यावे जेणेकरुन त्याचा वापर घणसोलीतील अतिअल्प उत्पन्न गटातील लोक करु शकतील तसेच सदर समाज मंदिराकरिता शासनाकडुन येणा-या निधीची वाट न बघता महानगरपालिकेने निधीची तरतूद करणे.

**52 व 53. श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**

**(52)** प्रभाग क्र. 11 ऐरोलीगाव संपूर्ण प्रभागातील जुन्य जिर्ण झालेल्या जलवाहीन्या बदलुन नव्याने मोठया व्यासाच्या जलवाहीन्या टाकणे. **(53)** प्रभाग क्र. 11 ऐरोलीगावातील जुन्य मलनि:स्सारण वाहीन्या बदलुन त्याठीकाणी नवीन मोठया मलनि:स्सारण वाहीन्या टाकणे.

**54. श्री. करण मनोहर मढवी, यांजकडून :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने ज्याप्रमाणे त्यांच्या महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणा-या मुलांना मोफत बेस्ट बससेवा उपलब्ध करुन दिलेली आहे त्या धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेनेही आपल्या शाळेत शिकणा-या मुलांना एन.एम.एम.टी. बससेवा मोफत उपलब्ध करणे.

**55 ते 57. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(55)** प्रभाग क्र. 01 ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागातील विदयुत वायर भुमिगत करणे. **(56)** नवी मुंबई महानगरपाकिकडून पाणी पुरवठा विभाग नवीन नळ जोडणी केल्यावर पाणी मीटर करिता शुल्क देऊन आणावा लागतो तो पुर्वरत निशुल्क पाणी मीटर पालिकेकडून देणे. **(57)** प्रभाग क्र. 01 ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.

**58. श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**

प्रभाग क्र. 108 मधील सेक्टर 48 येथील गायत्री सोसायटी ते विठ्ठल रुक्मीणी मंदीर पर्यंत रस्ता दुरुस्ती करणे.

**59. श्रीम. मीरा संजय पाटील, यांजकडून :-**
प्रभाग क्र. 90, नेरुळ येथे सेक्टर 09 आर्मी कॉलनी लगत तुलसी उदयानामध्ये खाली वर अशी दोन मैदाने आहेत. येथे संपुर्ण नेरुळ विभागातील मुले खेळण्यासाठी येतात ही दोन्ही मैदाने एकत्र करुन सुसज्ज स्टेडिअम बनविले तर येथे चांगली सुविधा उपलब्ध होईल. जसे सी.बी.डी. मध्ये स्व. राजीव गांधी मिनी स्टेडीअम बांधलेले आहे तशा प्रकारचे मिनी स्टेडीअम याठिकाणी बांधणे.

**60 ते 62. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**
**(60)** प्रभाग क्र. 48, पावणेगांव समाजमंदिर इमारतीमध्ये योगा वर्ग महानगरपालिकेतर्फे सुरू करणे. **(61)** प्रभाग क्र. 48, पावणे, श्रमिकनगर खैरणे येथे नागरी आरोग्य केंद्र बांधणे. **(62)** प्रभाग क्र. 48, पावणे, स्मशानभूमीमध्ये सुरक्षा रक्षकची नेमणूक करणे.

**63 ते 65 श्री. बहादूर त्रिलोकसिंह बिष्ट, यांजकडून :-**
**(63)** ठाणे-बेलापूर रोडलगत थॉमसन प्रेस, रिलायबल टाईम्स ऑफ इंडिया, भारत बिजली, सिमेन्स व महाराष्ट्र प्लावर मिल्स या कंपनी समोरील ठाणे-बेलापूर रोडच्या बाजूस असलेल्या उघड्या गटाराची रूंदी वाढवून आर.सी.सी. गटारे व पदपथ बांधून पदपथावर ग्रील लावणे. **(64)** प्रभाग क्र. 08, चिंचपाडा गवतेवाडी मधील गटारे व पदपथ बनविणे. **(65)** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एम.आय.डी.सी. झोपडपट्टी भागामधील ज्या झोपडीधारकाने स्वखर्चाने शौचालय बांधली आहेत. त्या झोपडीधारकांना (सर्वेक्षण झालेल्या झोपडीधारकांना) नळकनेक्शन देणे.

**66 ते 68. श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**
**(66)** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी., सेक्टर 9 येथील ग्रीन वक्षी (नर्सरी) येथे दिवाबत्तीची सोय करणे. **(67)** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी., सेक्टर 1अे येथील सायन-पनवेल हायवेलगत व मँगो गार्डनच्या समोर असलेल्या फूटपाथ कमी करून तेथे पार्किंगची व्यवस्था करणे. **(68)** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी., सेक्टर 9 येथील लेन नं. 5 ते लेन नं.8 च्या समोर असलेल्या गटारांवर तारेची कुंपन घालणे.

**69. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**
नवी मुंबईत ज्या ज्या ठिकाणी अनाथ आश्रम असतील तिथे राहणाऱ्यांपैकी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाल्यावर त्यांचा अंत्यविधी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या स्मशानभूमीमध्ये मोफत करणे.

**70 ते 72. श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**
**(70)** प्रभाग क्र. 47 मधील से. 5 ते 8 येथील कै. आण्णासाहेब पाटिल मैदानात व्यायामशाळा बांधणे.
**(71)** प्रभाग क्र.47 मध्ये एल.ई.डी. स्ट्रीट लाईट बसविणे
**(72)** प्रभाग क्र. 47 मधील रस्त्यांचे डांबरीकरण करुन योग्य त्या ठिकाणी गतिरोधक बसविणे.

**73 व 74. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**
**(73)**हुतात्मा बाबू गेनू मैदान भूखंड क्र.1, सेक्टर-8, सानपाडा दिनांक 30/11/2017 रोजी उदयान प्रयोजनासाठी हस्तांतरित करण्यात आला आहे.(आपल्या माहितीनुसार) परंतु गेल्या 15 वर्षापासून त्याचा वापर मैदान म्हणूनच होत आहे व त्याचे नामकरणही आपण "हुतात्मा बाबू गेनू मैदान" असे करण्यात आले आहे. तसेच गेल्या 15 वर्षापासून सर्व सांस्कृतीक काय्रक्रम याच मैदानात पार पाडले जात आहेत येणा-या विकास आराखडयामध्ये (DP PLAN) याचे आरक्षण मैदान असे करण्यात यावे व तेथे व तेथे उदयान विकसित करु नये. बाबू गेनू मैदानापासून 100 मीटर अंतरावर "सीताराम मास्तर उदयान" व "संत शिरोमणी उदयान" असताना भूखंड क्र. 1 चा वापर जनतेसाठी मैदान म्हणूनच वापर व्हावा.
**74)** हुतात्मा बाबू गेनू मैदानात हुतात्मा बाबू गेनू यांचे स्मारक उभारणे.

**75. श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**
नवी मुंबई वासीयांचा अवाजवी मालमत्ता कर कमी करावा यावास्तव मी सातत्याने आवाज उठविला आहे. त्याच बरोबर मी व माझ्या सहका-यांनी सलग एकोणिस दिवस उपोषणही केलेले आहे. त्यानंतर काही अंशी मालमत्ता कर कमी करण्यात आला होता. परंतु आजही तो सर्व सामान्यांच्या आवाक्याबाहेरचाच आहे. आज विविध सेवासुविधांवर समाधानकारक खर्च करुनही नवी मुंबई महानगरपालिकेकडे रुपये दोन हजार कोटी शिल्लक राहिलेले असून ते फिक्स डिपॉझिट म्हणून बक्रेत जमा आहेत. यावरुन नवी मुंबई महानगरपालिका आकारत असलेला कर किती अवाजवी आहे, याची प्रचिती येते. म्हणूनच याची भरपाई म्हणून पालिकेने नवी मुंबई वासीयांचा 2018-19 चा मालमत्ता कर पूर्णत: माफ करावा हि विनंती. त्याची अंमलबजावणी करुन नवीन अंदाजपत्रात तशी नोंद करावी.

**76 ते 78. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**
**(76)** प्रभाग क्र. 55, सेक्टर 11, कोपरखैरणे येथे बालाजी गार्डन सोसायटी ते रिलायन्स फ्रेश मॉल तसेच अय्यापा मंदिर पर्यंत दोन्ही बाजूने एम.एस ग्रील फुटपाथवर बसविणे. **(77)** प्रभाग क्र. 55, सेक्टर 11, कोपरखैरणे येथे फुटपाथची सुधारणा करणे. **(78)** प्रभाग क्र. 55 कोपरखैरणे येथील असलेले सर्व मार्गांचे नाव दर्शविणारे फलक ग्रेनाईट व मार्बल मध्ये बनविणे.

**79 व 80. श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-**
**(79)** प्रभाग क्र. 43 मधील कोपरखैरणे से. 17 रुम नं. 263 ते 450 पर्यंतच्या हाफ राऊंड गटारांची सुधारणा करणे. **(80)** प्रभाग क्र. 43 मधील कोपरखैरणे से. 18 रुम नं. 263 ते 906 पर्यंतच्या हाफ राऊंड गटारांची सुधारणा करणे.

**81 ते 83. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**
**(81)** कोकणभवन पार्कींग समोरील व सायन-पनवेल हायवे लगत असलेल्या नाल्याची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. तरी सदर नाल्याची सोलींग व पिंचींग करुन लवकरात लवकर सुधारणा करणे. **(82)** भाऊ पाटील चौक ते आग्रोळी उडाणपुलापर्यंत रस्ता अत्यंत खराब झालेला असून रस्त्याची डांगरीकरणाने लवकरात लवकर सुधारणा करणे. **(83)** अर्बन हट ते आय टी आय (ITI) कॉलेज पर्यंतच्या रस्त्याची दुरावस्था झाली असून सदर रस्त्याची डांबरीकरणाने लवकरात लवकर सुधारणा करणे.

**84 व 85. श्री. हरिचंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**
**(84)** प्रभाग क्र. 59, जुहूगांव, से.11 वाशी नवी मुंबई येथील जलकूंभाच्या बाजूला असलेले नागरी आरोग्य केंद्राची इमारत मोडकलीस आली आहे. सदर इमारत तोडून तेथे लग्नकार्यासाठी व इतर विधीकार्यायासाठी बहुउद्देशीय इमारत उभारणे. **(85)** प्रभाग क्र. 59, जुहूगांव, से.11 वाशी नवी मुंबई येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै. राधा सुदाम भोईर निवास बिल्डींग येथील मलनि:स्सारण वाहिणी दररोज ओव्हरफूल होऊन सांडपाणी बाहेर येते. सदर ठिकाणच्या कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी बदलून तेथे मोठ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे.

**86 ते 88. श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**

**(86)** प्रभाग क्र. 54, मधील वाशी सेक्टर 28 व 29 मधील नागरी वस्तीतून वाहणाऱ्या नाल्यालगतच्या दोन्ही रस्त्यावरती ए.पी.एम.सी. मार्केटला जाणाऱ्या व्यापारी व कामगारांच्या तसेच स्थानिक रहिवासी, स्कूल बस यांच्या वाहनांची सकाळी 5.00 ते रात्री 10.00 वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणात ये-जा चालू असते. रहदारीमुळे गेल्या दहा वर्षापासून पावसाळ्यामध्ये इतरही वेळीला रस्त्यावरती वारंवार खड्डे पडल्याने नागरिकांना वाहने चालवण्यास मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहतूकीची कोंडी व छोटे मोठे अपघात सतत घडत असतात. यासाठी रस्त्याची नव्याने सिमेंट कॉंक्रीटमध्ये बांधणी करणे गरजेचे आहे. तरी सदर बाबींचा गांभिर्याने विचार करून योग्य ती कार्यवाही व्हावी. **(87)** प्रभाग क्र. 54, वाशी सेक्टर 29 मधील शरयु गृहनिर्माण सोसायटी ते पंचज्योत गृहनिर्माण सोसायटी समोरील फुटपाथ बारा वर्षापासून नादुरूस्त असल्यामुळे पावसाळ्यात पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या बंद अवस्थेत असल्याने पावसाळी पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाल्याने रस्त्यावरती मोठ्या प्रमाणात पाणी साचून रहाते. त्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना, शाळकरी मुलांना, लहान मुलांना, वृद्धांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी सदर बाबत योग्य कार्यवाही होणे. **88)** प्रभाग क्र. 54, वाशी सेक्टर 29 मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने विकसित केलेले अतिशय सुंदर असे राजीव गांधी उद्यान असून सकाळपासून संध्याकाळपर्यंत उद्यानाचा आनंद घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने लहान मोठे अबाल वृध्द या परिसरातील व नवी मुंबईच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिक येत असतात. सदर मैदानाच्या उत्तर बाजूला लहान मुलांची विविध प्रकारची खेळण्याची साधने बसविलेली आहेत. मैदानाची जागा टणक असल्यामुळे लहान मुले खेळताना लहान मोठे अपघात होऊन ईजा होत असतात. हे अपघात टाळण्यासाठी खेळाच्या परिसरामध्ये आताच नवी मुंबई सेक्टर 26, कोपरी गांव येथील अम्युझमेंट पार्कमध्ये लहान मुलांच्या खेळण्याच्या परिसरात अतिशय सुंदर रबर मॅट टाकण्यात आलेली आहे. त्याच प्रकारचे रबर मॅट राजीव गांधी उद्यानातील लहान मुलांच्या खेळाच्या परिसरात टाकण्यात यावे. जेणे करून लहान मुलांना खेळताना ईजा पोहोचणार नाही. तरी सदर बाबत योग्य ती कार्यवाही होणे.

**89 व 91. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**

**(89)** ऐरोली सेक्टर-15 येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे आवारातील दर्शनी भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धकृती पुतळा बसविणे. **(90)** प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 या भागातील ज्ञानदिप शाळा ते गजानन महाराज मंदिरपर्यंत नवीन ड्रेनेज लाइन टाकणे अत्यंत गरजेचे आहे. सदरचे काम नागरिकांच्या समस्या विचारात घेऊन तातडीने पूर्ण करणे. **(91)** प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथील न.मुं.म.पा. या भूखंड क्र. 41/2B प्राथमिक आरोग्य केंद्र व वाचनालय न करता संपूर्ण इमारत स्पर्धा परिक्षा अभ्यासिका केंद्रासाठी देणे.

**92 ते 94. श्रीम. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :-**

**(92)** प्रभाग क्र. 52, सेक्टर 14 येथील भूखंड क्र. 116, क्षेपणीभूमी येथील वर्कशॉपचे कंपाऊंड वॉल व त्या जागेवरील कॉंक्रीटीकरण करून देणे. **(93)** प्रभाग क्र. 52, सेक्टर 14 येथील प्लॉट नं. 80 ते 88 व प्लॉट नं. 100 ते 106 बाजूचे गटर हेवी ड्युटी करून, रस्ता रूंदीकरण करणे. **(94)** प्रभाग क्र. 52, सेक्टर 14 येथील होल्डींग पॉईंट गेट ते ऑक्सिस बँकेच्या नाल्यालगत मोकळ्या जागेवर लॉन लावून सुधारणा करणे.

**95 ते 97. श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**

**(95)** नवी मुंबई महानगरपालिकेला 25 वर्षे पूर्ण होत असताना नवी मुंबईच्या हद्दीत प्लॉस्टिक बॅग व प्लॉस्टिकवर बंदी टाकणे. **(96)** नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वत:ची Hi-Tech पध्दतीची प्रदुषण तपासणी करता मोबाईल व्हॅन घेण्यांत यावी व Hi-Tech पध्दतीची प्रदुषण नियंत्रण करण्याकरिता प्रयोगशाळा बांधणे. **(97)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत सेक्टर - 7 जनता मार्केटच्या मागच्या बाजूला असलेला मोकळा भूखंड विकसित करून नागरिकांना उपयोगी असे उद्यान विकसित करणे.

**98 ते 100. श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**

**(98)** नेरूळ विभागात पूर्व पश्चिम दिशेला जाण्या येण्यासाठी सिडकोने बांधलेला भाररत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पादचारी पूल हा फारच अरूंद असून वाढलेल्या लोकसंख्येमुळे त्यावरून मार्गक्रमण करण्यास नागरिकांना गैरसोईचे ठरत आहे. ही गोष्ट विचारात घेऊन नेरूळ पूर्व पश्चिम दिशेला जोडण्यासाठी योग्य आकारमानाचे व आबाल वृध्दांना पुलावर चढ उतर करण्यास येण्यास सोईचे ठरावे अशा अद्यावत लिफ्टची अथवा सरकत्या जिन्यांची तरतूद असलेल्या स्काय वॉक पुलाची उभारणे. **(99)** मनपाने बोनकोड व रबाळे या ठिकाणच्या पादचारी पुलांवर ज्याप्रमाणे लिफ्टची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे मनपाने व सिडको किंवा अन्य प्राधिकरणांनी उभारलेल्या शहरातील सर्व पादचारी पुलांवर अद्यावत लिफ्टची अथवा सरकत्या जिन्यांची तरतूद करणे. **(100)** मनपाच्या माता बाल रूग्णालयांमध्ये प्रसुती नोंदणी केलेल्या महिलांना मनपाकडे सोई सुविधा नसल्याने खाजगी तसेच संस्थांच्या रूगणालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येत असल्याने सर्वसामान्य गरीब जनतेला औषधे बाहेरून खरेदी करावे लागतात. तरी ज्या प्रकरणांमध्ये सर्वसामान्य करदात्या गरीब जनतेला खाजगी तसेच संस्थांच्या रूग्णालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येते अशा प्रकरणांमध्ये लागणाऱ्या औषधांची व साहित्याची तरतूद हिब मनपाच्या माध्यमातून करणे.

**101. श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**
घणसोली सेक्टर 1 ते 9 या क्षेत्रात मुख्यत्वे अल्प व मध्यम उत्पन्न गटातील सर्वसामान्य जनतेचे वास्तव्य व त्यांच्या सहकारी गृह सस्थांच्या वसाहतीची उभारणी समयीच्या सिडकोच्या सदोष नियोजन धोरणामुळे या परिसरातील पदपथ व रस्ते अरूंद राहिलेले व ठेवलेले आहेत. त्यामुळे वाहने उभी करण्याबरोबरच रस्ते देखभालीतील त्रुटी व वारंवार विविध कारणासस्तव होणाऱ्या रस्ते पदपथांच्या खोदकामामुळे पादचाऱ्यांना मार्गक्रमण करताना गंभीर समस्यांना समोरे जावे लागते. त्यामुळे अशा कायमस्वरूपी निर्माण झालेल्या समस्यांमध्ये वाढ होऊ नये म्हणून इथल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील नागरी वसाहतींमधल्या पावसाळी नाला गटारांची, पदपथ, रस्तयांची पुर्नबांधणी करताना गॅस पाईपलाईन तसेच एमएसईबी आणि माहिती तंत्रज्ञान सेवा देणाऱ्या शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्था यांच्या केबलच्या संदर्भात पदपथालगत डक्ट पध्दतीची तरतूद करणे.

**102 ते 104. श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**
**(102)** प्रभाग क्र. 2, ईश्वरनगर येथे सिडको व्यवस्थापनाने राबविलेल्या क्लस्टर योजनेतील रहिवाशांकरिता रेल्वे ट्रॅक शेजारील नियोजित रस्ता बांधणे व डांबरीकरण करणे. **(103)** प्रभाग क्र. 2, मुकूंद कंपनी येथे ईश्वरनगर, रामनगर, गणपतीपाडा विभागातील 25 दशलक्ष लीटर क्षमतेची ओव्हरहेड पाण्याची टाकी बांधणे. **(104)** प्रभाग क्र. 2, ईश्वरनगर येथील सिडको वासाहतीमध्ये मलनि:स्सारण वाहिन्या टाकून सिडकोने सेफ्टी टँकसाठी राखीव ठेवलेल्या 50Sq.m. (स्टोरेज टँक) भूखंडामध्ये सेफ्टी टँक बांधणे.

**105 ते 107. श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**
**(105)** प्रभाग क्र. 103, मधील मागील दोन वर्षांपासून दुर्गामाता व संभाजीनगर या नागरी वसाहतीमधील दिव्यांचे जुने गंजलेले खांबांच्या ठिकाणी नवीन खांब लावण्यासह एलईडी स्वरूपातील दिव्यांची उपाययोजना करणे. **(106)** प्रभाग क्र. 103 च्या भौगोलिक परिक्षेत्रात मनपाने सन 1996 पासून इथल्या नागरी वस्तीमधील ज्या भूखंडावर वृक्षारोपन तसेच सुशोभिकरण केलेले आहे. अशा भूखंडाचे फेर सर्वेक्षण करून त्या भूखंडाचे योग्य पध्दतीने सुशोभिकरण करणे.

**(107)** प्रभाग क्र. 103 क्षेत्रातील खेळाच्या मैदानांची पावसाच्या अतिवृष्टीमुळे आणि मैदानांच्या देखभाल दुरूस्तीचे ठोस धोरण नसल्याने दुरावस्था झालेली आहे. तरी येथील मैदानांची देखभाल दुरूस्ती करून तिथे लाल मातीचा भराव करणे.

**108. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेच्या जेष्ठ नागरीक धोरणानुसार ज्येष्ठ नागरिकांकरीता विरंगुहा केंद्र बांधण्यात आलेली आहेत. त्याचा लाभ जेष्ठ नागरिक घेत आहेत. ज्या जेष्ठ नागरिकांचे मुलगा, सून किंवा इतर नातेवाईक नोकरी/व्यवसाय करतात त्यांच्या घरी दिवसा जेष्ठांचा सांभाळ करणारे कोणीही उपलब्ध नसते. तसेच वृध्दापकाळामुळे काही जेष्ठ नागरिक स्मृतिभ्रंश या समस्येने ग्रासलेले आहेत. अशा जेष्ठ नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देणेकरिता महानगरपालिकेमार्फत विरंगुळा केंद्र उभारणे.

**109 ते 111. श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**

**(109)** प्रभाग क्र. 45 मधील जुन्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकणे. **(110)** प्रभाग क्र. 45 मधील से. 3 येथे एल.ई.डी. लाईट्स बसविणे. **(111)** प्रभाग क्र. 45 मधील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

**112 ते 114. श्रीम.मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

**(112)** घणसोली विभागात आवश्यक तेथे आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले ओपन जिम उभारणे. **(113)** घणसोली विभागामध्ये नव्याने विकसित झालेल्या से. 06 येथे महिला सक्षमीकरण बांधण्यात आलेले आहे. त्यांचे काम पुर्ण झालेले आहे. तरीही ते लवकरात लवकर सुरु करून महिलांसाठी प्रिशिक्षण, आधार विक्री केंद्र, समुपदेशन केंद्र लवकरात लवकर सुरु करून तेथील नागरीकांना त्यांचा लाभ देणे. **(114)** घणसोली विभागात सार्वजनिक कार्यक्रमासाठी शेतकरी समाज मंदिर हॉलप्रमाणे सिडकोकडून भुखंड हस्तांतरीत करुन तेथेसार्वजनिक समाजमंदिर हॉल बांधणे.

**115.** नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ॲम्फीबीअस बस प्रकल्प सुरू करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 12 डिसेंबर 2017.**

,